# १३. प्रकाशातले तारे तुम्ही

• **ऐका. म्हणा. वाचा.**

प्रकाशातले तारे तुम्ही, अंधारावर रुसा
हसा, मुलांनो हसा ।। धृ.।।

तुम्हां बोलवी ती फुलराणी
खेळ खेळती वारा पाणी
आनंदाच्या शिखरावरती, खुशाल जाउन बसा ।। १ ।।

रडणे हा ना धर्म आपुला
हसण्यासाठी जन्म घेतला
भारतभूच्या आदर्शांचा, मनी उमटु दे ठसा ।। २।।

सर्व मागचा विसरा गुंता
अरे उद्याच्या नकोत चिंता
बघा, अरुण तो बाळांनो रे, तुम्हां खुणवितो कसा ।।३।।

**– उमाकांत काणेकर**



**शब्दार्थ :** **आनंदाचे शिखर** – खूप खूप आनंद. **ठसा उमटणे** – मनावर बिंबणे. **चिंता** – काळजी. **अरुण** – सूर्य. **खुणावणे** – खुणेने दाखवणे.

## स्वाध्याय

**प्र. १. तुमच्या शब्दांत सांगा.**

(अ) आनंदाच्या शिखरावर बसणे म्हणजे काय ?

(आ) तुम्हांला कशाची चिंता वाटते ? त्या वेळी तुम्ही काय करता ?

**प्र. २. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांना कोण बोलवत आहे ?

(आ) कवीने मुलांना कोठे बसायला सांगितले आहे ?

(इ) मुलांच्या मनावर कशाचा ठसा असावा, असे कवीला वाटते ?

(ई) मुलांनी कशाची चिंता करू नये, असे कवीला वाटते ?

(उ) मुलांना कोण खुणवत आहे ?

**प्र. ३. खालील व्यक्तींवर तुम्ही केव्हा रुसता किंवा खूश होता ते प्रत्येकी एकेका वाक्यात लिहा.**

(अ) आई (उ) मैत्रीण/मित्र

(आ) बाबा (ऊ) शिक्षक/शिक्षिका

(इ) आजोबा (ए) बहीण/भाऊ

(ई) आजी (ऐ) पाळीव प्राणी

**प्र. ४. खालील गोष्टी घडल्यावर तुम्हांला काय वाटते ?**

(अ) बाबा बाहेरगावी गेले.

(आ) ताईने सुंदर पेन दिले.

(इ) शाळेचा अभ्यास पूर्ण झाला नाही.

(ई) रस्त्यात पाय घसरून पडलात.

(उ) तुमच्या वर्गाने खेळाचा सामना जिंकला.

**प्र. ५. शेवटी समान अक्षर असणारे कवितेतील शब्द शोधा व लिहा.**

**उदा.,** फुलराणी – पाणी.

(अ) बसा (आ) गुंता

**प्र. ६. खालील शब्द वाचा. लिहा.**

कार्य, धैर्य, सूर्य, शौर्य, नर्मदा, पर्यंत, पर्यावरण, सर्व, धर्म, आदर्श.

**प्र. ७. खालील शब्दांतील अक्षरांपासून शब्द तयार करा.**

**उदा.,** भारत – भार, भात, तर.

(अ) शिखरावर (इ) आकाशात

(आ) अंधारावर (ई) पाऊसधारा

**प्र. ८. तुमच्या शाळेत ज्या थोर व्यक्तींची छायाचित्रे लावली आहेत, त्यांनी देशासाठी काय केले याची माहिती शिक्षकांकडून करून घ्या. त्यांपैकी एकाची माहिती पाच ते सात वाक्यांत लिहा.**


**प्रात्यक्षिक :** गुंता झालेली दोरी घ्या. गुंता सोडवा.

## आम्ही जाहिरात वाचतो

**या मुलांनो या रे या, लवकर सारे नाटक पाहा !**
**धमाल विनोदी बालनाट्य — माशाचं घोरणं पाहायला विसरू नका.**

**चौकस चिंगी आणि घोरणारा मासा**

उद्या शनिवार दिनांक : २२ एप्रिल
दुपारी : ३.३० वाजता
स्थळ – रंगकला नाट्यगृह, रेणापूर



| | | |
|---|---|---|
| **लेखक** | – | योगेश डिखळे |
| **दिग्दर्शक** | – | रजनी चिपलकट्टी |
| **निर्माती** | – | लता वानखेडे |
| **कलाकार** | – | २२ तडाखेबाज बालकलाकार आणि घोरणारा मासा. |

तिकीटविक्री नाट्यगृहावर रात्री ८ वाजेपर्यंत.
आजच तिकीट खरेदी करा. दर रुपये ५०/–,३०/–

**प्रत्येक तिकिटावर एक चिवडा–पाकीट चक्क मोफत !**

**रेणापूरच्या वर्तमानपत्रात आलेली ही जाहिरात पाहा. काळजीपूर्वक वाचा व उत्तरे लिहा.**

### स्वाध्याय

प्र. १. जाहिरात कशाची आहे ?

प्र. २. बालनाट्याचे नाव काय आहे ? बालनाट्य कोणत्या दिवशी आहे ?

प्र. ३. या नाटकाचे दिग्दर्शन कोणी केले आहे ?

प्र. ४. नाटक कोणासाठी आहे ? ते कशावरून कळते ?

प्र. ५. ज्या दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात आली, त्या दिवशी कोणता वार व तारीख असेल ? ते कशावरून कळते ?

प्र. ६. आजच तिकीट खरेदी करा, असे जाहिरातीत कशामुळे सांगितले असेल ? उद्या तिकीट खरेदी केले तर चालेल का ?


प्र. ७. सुमी तिकीट घ्यायला गेली. तिकीट देताना तिथले काका म्हणाले, ‘‘येताना टोप्या घालून या.’’ त्यांनी टोप्या घालून यायला का सांगितले असेल ?


प्र. ८. प्रत्येक तिकिटावर चिवडा–पाकीट मोफत मिळणार आहे. तुम्हांला चिवडा आवडतो का ? चिवड्याऐवजी काय मिळालेले तुम्हांला जास्त आवडेल ?

## आम्ही पुस्तक बनवतो

- **चित्रे पाहा. बोला.**









- **मुलांनो, वरील प्रत्येक चित्र नीट पाहा.**
- **चित्रांचा अर्थ समजून घेऊन कोणत्याही एका चित्राचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.**
- **अशी चित्रे जमवून चित्रांचा अर्थ समजून घेऊन माहिती लिहा किंवा गोष्ट तयार करून लिहा.**
- **वरील चित्रांप्रमाणे तुमच्या आवडीचे प्रसंगचित्र काढा. त्यावर गोष्ट/कविता लिहा.**

**प्रकल्प :** वरील सर्व साहित्य वापरून वर्षभरात तुमचे स्वत:चे पुस्तक तयार करा.

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी एकेक चित्र बोर्डवर लावावे. विद्यार्थ्यांशी चित्रांबाबत बोलावे. कल्पनेने चित्रांचे वर्णन कसे करता येईल याची दिशा द्यावी. मुलांना ते वर्णन, गोष्ट, माहिती व कविता या रूपांत कसे व्यक्त करावे याविषयी मार्गदर्शन करावे.